# साधना विद्यालयात वाद-विवाद स्पर्धा

पुणे : पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशनतर्फे शाळांगण प्रकल्पाअंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हडपसर येथील साधना विद्यालय येथील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात करण्यात आले. स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची जाणीव निर्माण व्हावी, संवाद कौशल्य वाढावे हा हेतू होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून पंख संस्थेच्या ट्रस्टी कल्याणी भाबड व साधना विद्यालयाच्या शिर्के यांनी काम पाहिले. पंख संस्थेतर्फे मुलांना पदके देण्यात आली. बक्षीस वितरण उप मुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.